खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३–२४

### साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला – मा. अनघा मोडक

## नकारात्मकता फेकून द्यायला शिका : अनघा मोडक

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** जगण्यातील सौंदर्य अनुभवायचे असेल आणि जगण्याचा उत्सव करायचा असेल तर सकारात्मक दृष्टिकोनातून विचार करून नकारात्मकता फेकून द्यायला शिका असे, आवाहन प्रसिद्ध निवेदिका अनघा मोडक यांनी केले. त्या हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'जगण्याचे गाणे होताना ' या विषयावर बोलत होत्या. याप्रसंगी संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षा राजमाला बुट्टे पाटील, संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, सुरेश टाकळकर, प्रमोद गाणू, प्राचार्य डॉ.एस.एस.पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, प्रबंधक के.आर.पाचारणे उपस्थित होते.

दैनिक दायित्व
DAINIK DAYITVA



# नकारात्मकता फेकून द्यायला शिका - अनघा मोडक

राजगुरुनगर : जगण्यातील सौंदर्य अनुभवायचे असेल आणि जगण्याचा उत्सव करायचा असेल तर सकारात्मक दृष्टिकोनातून विचार करून नकारात्मकता फेकून द्यायला शिका असे आवाहन प्रसिद्ध निवेदिका अनघा मोडक यांनी केले. त्या हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'जगण्याचे गाणे होताना ' या विषयावर बोलत होत्या. याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षा राजमाला बुट्टे पाटील, संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, सुरेश टाकळकर, प्रमोद गाणू, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ.एच. एम.जरे, प्रबंधक के.आर.पाचारणे उपस्थित होते. अनघा मोडक यांनी पुढे बोलताना त्यांना आलेल्या अंधत्वाबद्दल माहिती सांगितली. माझी दृष्टी गेली तरी खचून न जाता सकारात्मक दृष्टिकोनामुळे अंतर्मनाची नवीन कवाडे उघडली. माझ्या डोळ्यासमोर जरी अंधार असला तरी सकारात्मकतेमुळे माझे प्रत्येक पाऊल प्रकाशाकडे पडत असल्याचे त्या म्हणाल्या. जीवन जगताना येणाऱ्या अडचणी, संकटे ही हलकीच असतात. आपण त्यांना धरून ठेवतो म्हणून त्यांचे वजन वाढते. त्यामुळे नकारात्मकतेला कुरवाळत बसू नका. आयुष्यात येणारी संकटे आपल्याला पुढे घेऊन जाण्यासाठी आलेली असतात, त्याकडे दूरदृष्टीने पाहता आले पाहिजे असे सांगून आपल्याकडे नसलेल्या गोष्टींची चिंता करीत बसण्यापेक्षा असलेल्या गोष्टींचा सकारात्मकतेने उपयोग करून जीवनात यशस्वी व्हा, सकारात्मकतेला आयुष्याचा जोडीदार करा असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विठ्ठल दौंडकर यांनी, परिचय डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार तेजेस्विनी गौड या विद्यार्थीनीने मानले.

पुढारी

# नकारात्मकता फेकून द्यायला शिका : मोडक

## साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमाला

**राजगुरूनगर : पुढारी वृत्तसेवा**

जगण्यातील सौंदर्य अनुभवायचे असेल आणि जगण्याचा उत्सव करायचा असेल, तर सकारात्मक दृष्टिकोनातून विचार करून नकारात्मकता फेकून द्यायला शिका, असे आवाहन प्रसिद्ध निवेदिका अनघा मोडक यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'जगण्याचे गाणे होताना' या विषयावर त्या बोलत होत्या. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षा राजमाला बुट्टे पाटील, संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, सुरेश टाकळकर, प्रमोद गाणू, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे उपस्थित होते. मोडक म्हणाल्या की, माझी दृष्टी गेली तरी खचून न जाता सकारात्मक दृष्टिकोनामुळे अंतर्मनाची नवीन कवाडे उघडली. माझ्या डोळ्यांसमोर जरी अंधार असला तरी सकारात्मकतेमुळे माझे प्रत्येक पाऊल प्रकाशाकडे पडते. जीवनातील अडचणी, संकटे ही हलकीच असतात. आपण त्यांना धरून ठेवतो म्हणून त्यांचे वजन वाढते. त्यामुळे नकारात्मकतेला कुरवाळत बसू नका. आयुष्यात येणाऱ्या संकटांकडे दूरदृष्टीने पाहता आले पाहिजे. आपल्याकडे नसलेल्या गोष्टींची चिंता करीत बसण्यापेक्षा असलेल्या गोष्टींचा सकारात्मकतेने उपयोग करून जीवनात यशस्वी व्हा, सकारात्मकतेला आयुष्याचा जोडीदार करा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. सूत्रसंचालन प्रा. विठ्ठल दौंडकर यांनी केले. परिचय डॉ. संजय शिंदे यांनी करून दिला. तेजेस्विनी गौड हिने आभार मानले.

My Gramin Edition
Feb 2, 2024 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभागप्रमुख